**महाराष्ट्र शासन**

<u>अत्यंत महत्वाचे/</u>
<u>कालमर्यादीत</u>

ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन २५, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४००००१

**क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१६६/पंरा-३** **दिनांक :-३० जुलै, २०२५.**

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद

**विषय- धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA JGUA) अंतर्गत करावयाच्या कामांना १५ ऑगस्ट, २०२५ रोजी होणा-या ग्रामसभेत मंजुरी घेण्याबाबत...**

देशातील आदिवासी जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA JGUA) या योजनेचा दि.०२ ऑक्टोबर, २०२४ रोजी मा.पंतप्रधान महोदयांच्या हस्ते शुभारंभ करुन सदर योजना संपूर्ण देशभरात सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्य क्षेत्रे व १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. याव्दारे आदिवासी जमातींचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे. सदर योजनेसाठी राज्यातील ३२ जिल्हांची निवड करण्यात आली असून यामध्ये राज्यातील २१४ तालुक्यांचा व ४९७५ गावांचा समावेश आहे. सदर योजनेतंर्गत १७ मंत्रालयामार्फत २५ प्राधान्यक्षेत्रात खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात येणारे आहेत:-

| अ. क्र. | मंत्रालय/विभागाचे नाव | | उपक्रम/ योजना |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण विकास मंत्रालय (MoRD) | १ | प्रधान मंत्री ग्रामीण आवास योजना अंतर्गत पक्की घरे -(PMAY) |
| | | २ | प्रधान मंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत आदिवासी वस्त्या/ वाड्या/पाड्यांना मुख्य रस्त्यासोबत जोडणारे पक्के रस्ते (PMGSY) |
| २ | जलशक्ती मंत्रालय (MoJS) | | जल जीवन मिशन अंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांना घरगुती पाणी पुरवठा |

VBW

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३ | जल जीवन मिशन अंतर्गत आदिम जातींचा अधिवास असलेल्या गावांमध्ये सामाईक नळ जोडणी द्वारे पाणी पुरवठा |
| ३ | ऊर्जा मंत्रालय (MoP) | | अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांसाठी वीज जोडणी |
| | | ४ | गावातील सार्वजनिक संस्था ऊदा. ग्रामपंचायत, शाळा, ई. साठी वीज जोडणी |
| ४ | नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (MoNRE) | | सौर ऊर्जेद्वारे अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांसाठी वीज जोडणी |
| | | ५ | सौर ऊर्जेद्वारे गावातील सार्वजनिक संस्था ऊदा. ग्रामपंचायत, शाळा, ई. साठी वीज जोडणी |
| ५ | आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय (MoHFW) | ६ | राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मोबाईल मेडिकल यूनिट द्वारे आरोग्य सेवा |
| | | ७ | प्रधान मंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत “आयुष्मान भारत कार्ड” च्या लाभांचे वितरण |
| ६ | पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय (MoPNG) | ८ | प्रधान मंत्री उज्ज्वला योजने अंतर्गत एल. पी. जी. गॅस जोडणी |
| ७ | महिला आणि बाल विकास मंत्रालय (MoWCD) | | पोषण अभियान अंतर्गत नवीन अंगणवाड्यांची उभारणी |
| | | ९ | पोषण अभियान अंतर्गत जुन्या अंगणवाड्यांचे बळकटीकारण |
| ८ | शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग (DoSEL) | १० | समग्र शिक्षा अभियान अंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची उभारणी |
| ९ | आयुष मंत्रालय (MoAYUSH) | ११ | राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत EMRS शाळांमध्ये पोषण वाटीकांचा विकास |
| १० | दूरसंचार विभाग (DoTelecom) | १२ | अनुसूचित जमातींचा अधिवास असलेल्या गावांमध्ये दूरसंचार जोडणी |
| ११ | कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (MoSDE) | १३ | अनुसूचित जमातींचा अधिवास असलेल्या ३० जिल्ह्यांमध्ये कौशल विकास केंद्रांची स्थापना |
| | | १४ | कौशल भारत अभियान अंतर्गत अनुसूचित जमातींच्या युवकांना तसेच वन धन विकास केंद्रांशी संलग्न लाभर्थ्यांना कौशल आधारित प्रशिक्षण |
| १२ | इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (MeiTY) | १५ | जनजातीय डिजिटल उपक्रम -BISAG N (गतीशक्ती) पोर्टल, आदिप्रसारण पोर्टल |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय (MoAFW) | १६ | FRA पट्टा धारकांसाठी "शाश्वत शेतीला प्रोत्साहन" - DoAFW च्या अनेक योजना |
| १४ | मत्स्यव्यवसाय मंत्रालय (MoFAHD) | १७ | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना अंतर्गत CFR धारकांसाठी विविध योजना |
| | पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय (MoFAHD) | १८ | FRA पट्टा धारकांसाठी "राष्ट्रीय पशुधन अभियान" पशुधन संगोपनाच्या योजना |
| १५ | पंचायत राज मंत्रालय (MoPR) | १९ | "राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (RGSA)" अंतर्गत राज्य, जिल्हा, उपविभाग व गाव पातळीवरील अधिकारी-कर्मचारी यांची FRA संदर्भातील क्षमता बांधणी |
| १६ | पर्यटन मंत्रालय (MoTourism) | २० | स्वदेश दर्शन योजने अंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थी साठी "आदिवासी - होम स्टे" योजना |
| | | | स्वदेश दर्शन योजने अंतर्गत गाव पातळीवरील सांमुदायिक उपक्रम |
| १७ | जनजातीय कार्य मंत्रालय (MoTA) | २१ | आदिवासी विकासासाठी विशेष केंद्रीय सहाय्य (PMAAGY) योजनेची व्याप्ती वाढविण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचीबद्ध केलेले उपक्रम राबविणे |
| | | i. | आदिवासी बहुउद्देशीय विपणन केंद्रांची (TMMC) स्थापना |
| | | ii. | आदिवासी आश्रम स्कूल आणि वसतिगृहे यांचे बळकटीकरण |
| | | iii. | सिकल सेल अनेमिया निर्मूलन अभियान अंतर्गत सेंटर ऑफ कॉम्पिटन्स (CoC) ची स्थापना व रुग्णांना समुपदेशन तसेच औषधोपचार |
| | | iv. | CFR & FRA केंद्रांची स्थापना आणि व्यवस्थापन |
| | | v. | प्रचार प्रसिद्धी (IEC) आणि प्रकल्प व्यवस्थापन |
| | | | उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आदिवासी जिल्ह्यासाठी रु. २० लाख वार्षिक प्रोत्साहन |

उपरोक्त नमूद मंत्रालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA JGUA) योजनेंतर्गत संबंधित विभाग आराखडा तयार करणे अपेक्षित आहे. त्यास संबंधित केंद्रीय मंत्रालयाची मान्यता प्राप्त होऊन मान्यताप्राप्त आराखडयांसाठी निधी उपलब्ध होणार आहे.

२. धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DA JGUA) अंतर्गत १७ मंत्रालयांकडून तयार करण्यात येणा-या आराखड्यांमध्ये ग्रामीण भागातील विविध विकास कामांचा समावेश असणार आहे. सबब आराखडयात समाविष्ट ज्या कामांना ग्रामसभेची मान्यता घेणे आवश्यक असेल अशा कामांना दि. १५ ऑगस्ट,

२०२५ रोजी होणा-या ग्रामसभेच्या बैठकीत मान्यता घेण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना सुचना देण्यात याव्यात. जेणेकरुन धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत संबंधित प्रशासकीय विभागांना केंद्रशासनास मंजूरी व निधी प्राप्त होण्याकरिता त्वरेने प्रस्ताव सादर करणे शक्य होईल.

(एकनाथ डवले)
प्रधान सचिव (ग्राम विकास), महाराष्ट्र शासन

(विजय वाघमारे)
सचिव (आदिवासी विकास), महाराष्ट्र शासन